# मराठी भाषा संवर्धन पंधरवडा २०२६
## अहवाल
## (दिनांक ०२/०२/२०२६)

श्री व्यंकटेश महाविद्यालयातील मराठी विभाग आणि श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालय, चिखली येथील मराठी विभाग यांच्या सामंजस्य करारानुसार मराठी भाषा संवर्धन पंधरवडा आयोजित करण्यात आला. या निमित्ताने कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले. कवी संमेलनाचे उद्घाटन सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. भगवान खरात यांच्या हस्ते व प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर गोरे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख प्रा. मधुकर जाधव यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. ज्योती ढोकले यांनी केले.

डॉ. भगवान खरात यांनी कवी संमेलनाचे उद्घाटन करताना मनोगत व्यक्त केले. संत कवितेपासून तर आधुनिक कवितेपर्यंतचा प्रवास त्यांनी विविध उदाहरणांच्या माध्यमातून उलगडून दाखविला. आजच्या कवींनी सभोवताळच्या वास्तवाचा विचार करून लेखन करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर गोरे यांनी कविता हे अभिव्यक्तीचे प्रभावी माध्यम असल्याचे प्रतिपादन करताना या अभिव्यक्तीने निडरता बाळगावी असा सल्ला दिला.

जालना येथील ज्येष्ठ ग्रामीण साहित्यिक डॉ. प्रभाकर शेळके यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित निमंत्रितांच्या कवी संमेलनात श्री शिवाजी महाविद्यालयातील मराठी विभागप्रमुख डॉ. गणेश मालटे यांच्या सूचनेनुसार त्यांच्या विभागाचे प्रा. प्रशांतकुमार डोंगरदिवे सहभागी झाले व त्यांनी बहारदार सूत्रसंचालन केले. श्री. विजय दळवी यांनी खास विनोदी शैलीत काव्य सादर केले. प्रा. अश्विनी जाधव – मेहेत्रे यांनी स्त्रीवादी विचार व्यक्त करणाऱ्या कवितांचे सादरीकरण केले. जयदीप विघ्ने यांनीही कवी संमेलनात सहभाग नोंदविताना गझल, कविता यांचे उत्कृष्ट सादरीकरण केले.

कवी संमेलनाच्या उद्घाटन समारोहासाठी तसेच कवी संमेलनासाठी रसिक श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Head, Dept. of Marathi
Shri Vyankatesh Art's, Commerce &
Science College, Deulgaon Raja
Dist.Buldhana - 443 204 (M.S.)










**कवी संमेलन उद्घाटन समारोहाची क्षणचित्रे**

कवी संमेलनाची क्षणचित्रे...










कवी संमेलनाची क्षणचित्रे...

लोकशाही वार्ता

# श्री व्यंकटेश महाविद्यालयात कविसंमेलन



**लोकशाही वार्ता/ देऊळगावराजा**

स्थानिक श्री व्यंकटेश महाविद्यालयात मराठी विभागाच्यावतीने भाषा संवर्धन पंधरवडानिमित्त कवी संमेलन आयोजित करण्यात आले. या संमेलनाचे उद्घाटन सुप्रसिद्ध साहित्यिक व व्याख्याते डॉ. भगवान खरात यांनी केले. व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर गोरे, कवी संमेलनाध्यक्ष डॉ. प्रभाकर शेळके व कवी संमेलनाचे समन्वयक प्रा. मधुकर जाधव यांची उपस्थिती होती.

उद्घाटकीय मनोगत व्यक्त करताना डॉ. भगवान खरात यांनी मराठी कवितेची परंपरा आणि भाषा संवर्धनासाठी तिचे योगदान सविस्तर समजावून दिले. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर गोरे यांनी मराठी भाषेचे संवर्धन करण्यासाठी काय उपाययोजना करता येईल याबाबत मते मांडली. उद्घाटन समारोहाचे सूत्रसंचालन डॉ. ज्योती ढोकले यांनी, तर आभार प्रा. सीमा धुळे यांनी मानले.

डॉ. प्रभाकर शेळके यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या कवी संमेलनात प्रा. अश्विनी जाधव - मेहेत्रे, प्रा. प्रशांतकुमार डोंगरदिवे, जयदीप विघ्ने, विजय दळवी यांनी विविध विषयावर कविता सादर करून संमेलन बहारदार केले. याप्रसंगी भावनांच्या लाटा या पुस्तकाबद्दल रमेश नरोडे व भवरभिंगरी या कवितासंग्रहाबद्दल जयदीप विघ्ने यांचा सत्कार करण्यात आला. कवी संमेलनाचा आस्वाद घेण्यासाठी राजेश घोडचौरे, प्रा. प्रल्हाद कुरंगळ, मरणयातना कादंबरीकार भिकानाथ बोरकर, रामपूरकर, शेजुळ, रायमल यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

05/02/2026 | Page No: 9
lokshahivarta.co.in

Jijau Nagri

04 FEB 2026

# Poets' Meet Held at Shri Venkatesh College

By RAFIK SAIYYAD



Deulgaon Raja: A poets' meet was organised at Shri Venkatesh College by the Department of Marathi as part of the Language Conservation Fortnight. The event was inaugurated by noted litterateur and orator Dr Bhagwan Kharat. College principal Dr Dnyaneshwar Gore presided over the programme, while the event was chaired by poet Dr Prabhakar Shelke. The programme was coordinated by Prof Madhukar Jadhav. Other dignitaries present on the dais included faculty members and invited poets. In his inaugural address, Dr Kharat elaborated on the rich tradition of Marathi poetry and highlighted its significant role in preserving and promoting the Marathi language. In his presidential address, Dr Gore shared his views on practical measures required for the conservation and enrichment of the Marathi language in the academic and social spheres. The inaugural session was compered by Dr Jyoti Dhokle, while Prof Seema Dhule proposed the vote of thanks. The poets' meet, conducted under the chairmanship of Dr Prabhakar Shelke, witnessed poetry recitals by Prof Ashwini Jadhav-Mehetre, Prof Prashantkumar Dongardive, Jaydeep Vighne and Vijay Dalvi, who captivated the audience with poems on diverse themes. On the occasion, Ramesh Narode was felicitated for his book Bhavanancha Lata, while Jaydeep Vighne was honoured for his poetry collection Bhavarbhingari. A large number of professors, non-teaching staff and students, including Rajesh Ghodchaure, Prof Pralhad Kurangal, novelist Bhikanath Borker (author of Maranyatana), Rampurkar, Shejul Saheb and Raimul Sir, attended the event and appreciated the literary initiative.

## मराठी भाषा गौरव दिन (दिनांक २७/०२/२०२६)

## अहवाल

**प्रास्ताविक**

कविवर्य कुसुमाग्रज यांची जयंती मराठी भाषा गौरव दिन म्हणून देखील महाराष्ट्रभर साजरी केली जाते. मराठी आपली मातृभाषा आहे. या मध्ये मातृ हा शब्द खूप महत्त्वाचा आहे. आपल्या आई विषयी आपल्याला जो आदर असतो, जे प्रेम असते तोच आदरभाव आणि प्रेमभाव आपण मराठी भाषेविषयी बाळगावा, या प्रांजल भूमिकेतून महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने खालील कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

**०१. पुस्तक प्रकाशन समारोह**

श्री व्यंकटेश कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये श्री शिवाजी महाविद्यालय, चिखली येथील मराठी विभागप्रमुख डॉ. गणेश मालटे यांच्या सहकार्याने मराठी भाषा गौरव दिन अर्थात कवी कुसुमाग्रज जयंती निमित्त शाहीर सुखदेव गणपत साळवे यांच्या 'एकतारी भजन माला', 'लोकगीतांचा संगीत खजिना', 'संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान' आणि 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले' या चार पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर गोरे यांची उपस्थिती होती. पुस्तकांचे प्रकाशन ज्येष्ठ साहित्यिक ॲड. डॉ. विजयकुमार कस्तुरे यांच्या हस्ते संपन्न झाले. प्रमुख अतिथी म्हणून ग्रामीण साहित्यिक कडुबा बनसोडे, ज्येष्ठ कथाकार बबन महामुने, यांच्यासह शाहीर सुखदेव साळवे आणि सौ. कमलबाई साळवे यांची उपस्थिती होती.

**०२. प्रबोधनपर गीत गायन कार्यक्रम**

मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून प्रबोधनपर गीत गायन कार्यक्रम देखील आयोजित करण्यात आला. यामध्ये शाहीर सुखदेव साळवे आणि त्यांच्या सोबत असलेल्या सौ. कमलबाई सुखदेव साळवे, सौ. मंगल भानुदास पहुरे, ज्ञानदेव निकाळजे, सखाराम कचरू गवई, महादेव काकडे, दत्तात्रय झोरे या कला पथकाने प्रबोधनपर गीते सादर करून उपस्थितांचे उद्बोधन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी.कॉम. द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी कु. भक्ती लटके हिने केले. अतिथी परिचय इंग्रजी विभागातील डॉ. ज्योती ढोकले-देशमुख यांनी करून दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख प्रा. मधुकर जाधव यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रा. सौ. सीमा धुळे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

Head, Dept. of Marathi
Shri Vyankatesh Art's, Commerce &
Science College, Deulgaon Raja
Dist.Buldhana - 443 204 (M.S.)

श्री बालाजी संस्थान, देऊळगाव राजा द्वारा संचालित

# श्री व्यंकटेश कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, देऊळगाव राजा, जि. बुलढाणा


मराठी विभाग व्दारा आयोजित



# कवी कुसुमाग्रज जयंती

अर्थात

# मराठी भाषा गौरव दिन



निमित्त

## प्रबोधनपर गीतगायन आणि

## कवी सुखदेव साळवे लिखित पुस्तक प्रकाशन समारंभ

*** विशेष उपस्थिती ***

**मा.श्रीमंत राजे विजयसिंह जाधव**

(राजे लखुजीराव जाधव यांचे सि.राजा व दे.राजा शाखेचे वंशज, वंशपारंपरिक विश्वस्त, श्री बालाजी संस्थान, दे.राजा, अध्यक्ष, श्री व्यंकटेश महाविद्यालय दे. राजा)

**मा. राणीसाहेब सौ.छायाराजे विजयसिंह जाधव**

(व्यवस्थापन प्रतिनिधी, श्री व्यंकटेश महाविद्यालय, दे. राजा)

*** कार्यक्रमाचे अध्यक्ष ***

**मा.डॉ.ज्ञानेश्वर गोरे**

(प्राचार्य, श्री व्यंकटेश महाविद्यालय,देऊळगाव राजा)

*** प्रकाशन शुभहस्ते ***

**मा.ॲड.डॉ.विजयकुमार कस्तुरे**

(ज्येष्ठ साहित्यिक, चिखली)

*** प्रमुख अतिथी ***

**मा.बबन महामुने**

(सुप्रसिद्ध कथाकार,छ.संभाजीनगर)

**मा.कडुबा बन्सोडे**

(ज्येष्ठ कवी,बुलढाणा)

*** समन्वयक ***

**प्रा.मधुकर जाधव**

(मराठी विभागप्रमुख)

*** दिनांक ***

२७ फेब्रुवारी २०२६

वेळ : स.११:०० वा.

*** स्थळ ***

महाविद्यालयाचे सभागृह

अभिजीत डिजीटल अँड प्रिंटिंग सि.राजा 7507596054








कविवर्य कुसुमाग्रज यांना अभिवादन, पुस्तक प्रकाशन आणि शाहीर सुखदेव साळवे यांचा सपत्नीक सत्कार










ज्येष्ठ साहित्यिक ॲड. डॉ. विजयकुमार कस्तुरे, ग्रामीण साहित्यिक कडुबा बनसोडे, ज्येष्ठ कथाकार बबन महामुने, मनोगत व्यक्त करताना सोबत उपस्थित शाहीर सुखदेव साळवे, सौ. कमलबाई साळवे व इतर मान्यवर










प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर गोरे (अध्यक्षीय मनोगत), प्रा. मधुकर जाधव (प्रास्ताविक), डॉ. ज्योती ढोकले (अतिथी परिचय)











कु. भक्ती लटके (सूत्रसंचालन), शाहीर सुखदेव साळवे आणि कलासंच (प्रबोधनपर गीत सादरीकरण), मान्यवरांचे सत्कार

आपल्या शहरातील प्रत्येक बातमी साठी स्थान
आमच्या सोबत..आता दररोज रहा अपडेट !
# परतवाडा टाईम्स
SOCIAL MEDIA EDITION
संपादक:-नरेश तायवाडे
देशमुख प्लॉट,पेन्शनपुरा परतवाडा ता.अचलपूर,जि.अमरावती-444805 | भ्रमणध्वनी-9552970699 | paratwadatimes@gmail.com | paratwadatimes | YouTube paratwadatimes
दि. 27-02-2026

## व्यंकटेश महाविद्यालयात मराठी भाषा गौरवदिन उत्साहात
## शाहीर सुखदेव साळवे यांच्या चार पुस्तकांचे प्रकाशन

**देऊळगाव राजा | प्रतिनिधी**

स्थानिक श्री व्यंकटेश महाविद्यालयामध्ये मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिन अर्थात कवी कुसुमाग्रज जयंती निमित्त सुखदेव साळवे यांच्या चार पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले तसेच प्रबोधन पर गीत गायन कार्यक्रम देखील आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्रा.डॉ. ज्ञानेश्वर गोरे यांची उपस्थिती होती. पुस्तकांचे प्रकाशन ज्येष्ठ साहित्यिक ॲड. डॉ. विजयकुमार कस्तुरे यांच्या हस्ते संपन्न झाले. प्रमुख अतिथी म्हणून ग्रामीण साहित्यिक कडुबा बनसोडे, ज्येष्ठ कथाकार बबन महामुने, यांच्यासह शाहीर सुखदेव साळवे आणि सौ. मंगल साळवे यांची उपस्थिती होती.



ॲड. डॉ. विजयकुमार कस्तुरे यांनी साहित्यिकांनी ठाम भूमिका घेणे गरजेचे आहे, असे मत मांडले. कडुबा बनसोडे यांनी देखील साहित्यिकांनी आपली जबाबदारी ओळखून लेखन केले पाहिजे, असे आवाहन केले. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना डॉ. ज्ञानेश्वर गोरे यांनी मराठी भाषा संवर्धन जनजागृती विषयक विचार मांडले.

शाहीर सुखदेव साळवे आणि त्यांच्या सोबत असलेल्या कलापथकाने प्रबोधनपर गीते सादर करून उपस्थितांचे उद्बोधन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी कु. भक्ती लटके हिने केले. अतिथी परिचय डॉ. ज्योती ढोकले-देशमुख यांनी करून दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख प्रा. मधुकर जाधव यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रा. सीमा धुळे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी रामेश्वर वायाळ, रमेश नरोडे, डॉ. डी. व्ही. खरात, रमेश खंदारे यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# जिजाऊ एक्सप्रेस
SOCIAL MEDIA EDITION
संपादक : रामदास कहाळे
अडगाव राजा ता. सिंदखेडराजा जि.बुलढाणा | भ्रमणध्वनी : 9881779820 | ramdaskahale25@gmail.com | Ramdaskahale | YouTube People'snews 24
दि :27/02/2026

## श्री व्यंकटेश महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन संपन्न
## शाहीर सुखदेव साळवे यांच्या चार पुस्तकांचे प्रकाशन

**देऊळगाव राजा : देवानंद झोटे**

स्थानिक श्री व्यंकटेश महाविद्यालयामध्ये मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिन अर्थात कवी कुसुमाग्रज जयंती निमित्त सुखदेव साळवे यांच्या चार पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले तसेच प्रबोधन पर गीत गायन कार्यक्रम देखील आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर गोरे यांची उपस्थिती होती. पुस्तकांचे प्रकाशन ज्येष्ठ साहित्यिक ॲड. डॉ. विजयकुमार कस्तुरे यांच्या हस्ते संपन्न झाले. प्रमुख अतिथी म्हणून ग्रामीण साहित्यिक कडुबा बनसोडे, ज्येष्ठ कथाकार बबन महामुने, यांच्यासह शाहीर सुखदेव साळवे आणि सौ. मंगल साळवे यांची उपस्थिती होती.

ॲड. डॉ. विजयकुमार कस्तुरे यांनी साहित्यिकांनी ठाम भूमिका घेणे गरजेचे आहे, असे मत मांडले. कडुबा बनसोडे यांनी देखील साहित्यिकांनी आपली जबाबदारी ओळखून लेखन केले पाहिजे, असे आवाहन केले. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर गोरे यांनी मराठी भाषा संवर्धन जनजागृती विषयक विचार मांडले. शाहीर सुखदेव साळवे आणि त्यांच्या सोबत असलेल्या कलापथकाने प्रबोधनपर गीते सादर करून उपस्थितांचे उद्बोधन केले.



कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी कु. भक्ती लटके हिने केले. अतिथी परिचय डॉ. ज्योती ढोकले-देशमुख यांनी करून दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख प्रा. मधुकर जाधव यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रा. सौ. सीमा धुळे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी रामेश्वर वायाळ, रमेश नरोडे, डॉ. डी. व्ही. खरात, रमेश खंदारे यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

दैनिक विदर्भ सत्यजीत

• प्रमुख मार्गदर्शक - शौकत भाई शेख // • प्रमुख संपादक - उद्धव श्रीराम फंगाळ 9511446111/9921746611 // • E-Paper: www.vidharbhsatyajeet.in • RNI - MAHMAR - 2023/88726

# श्री व्यंकटेश महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन संपन्न

## शाहीर सुखदेव साळवे यांच्या चार पुस्तकांचे प्रकाशन




देऊळगाव राजा.. स्थानिक श्री व्यंकटेश महाविद्यालयामध्ये मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिन अर्थात कवी कुसुमाग्रज जयंती निमित्त सुखदेव साळवे यांच्या चार पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले तसेच प्रबोधन पर गीत गायन कार्यक्रम देखील आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर गोरे यांची उपस्थिती होती. पुस्तकांचे प्रकाशन ज्येष्ठ साहित्यिक ॲड. डॉ. विजयकुमार कस्तुरे यांच्या हस्ते संपन्न झाले. प्रमुख अतिथी म्हणून ग्रामीण साहित्यिक कडुबा बनसोडे, ज्येष्ठ कथाकार बबन महामुने, यांच्यासह शाहीर सुखदेव साळवे आणि सौ. मंगल साळवे यांची उपस्थिती होती. ॲड. डॉ. विजयकुमार कस्तुरे यांनी साहित्यिकांनी ठाम भूमिका घेणे गरजेचे आहे, असे मत मांडले. कडुबा बनसोडे यांनी देखील साहित्यिकांनी आपली जबाबदारी ओळखून लेखन केले पाहिजे, असे आवाहन केले. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर गोरे यांनी मराठी भाषा संवर्धन जनजागृती विषयक विचार मांडले.शाहीर सुखदेव साळवे आणि त्यांच्या सोबत असलेल्या कलापथकाने प्रबोधनपर गीते सादर करून उपस्थितांचे उद्बोधन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी कु. भक्ती लटके हिने केले. अतिथी परिचय डॉ. ज्योती ढोकले-देशमुख यांनी करून दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख प्रा. मधुकर जाधव यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रा. सौ. सीमा धुळे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी रामेश्वर वायाळ, रमेश नरोडे, डॉ. डी. व्ही. खरात, रमेश खंदारे यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

